# <u>रे.दि.मु.नं. १०५/२०१६ मधील</u>
# <u>नि.३० वरील आदेश</u>

**<u>सीएनआर–एमएचएसएन१२–०००७४२–२०१६</u>**

(तुकाराम जाधव विरुध्द शंकर जाधव व इतर)

वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी व हद्दी कायम करुन मिळणेसाठी दाखल केला असुन वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी दाखल केलेला आहे.

(२). वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये दावा मिळकत सि.स.नं.९३ मधील अस्तित्वात असणारा रस्ता नाकारला आहे. त्यामुळे सि.स.नं.९३ या मिळकतीची मोजणी होऊन वस्तुस्थिती अभिलेखावर येणेसाठी कमीशनर मार्फत मोजणी होणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

(३). प्रतिवादी नं.२–अ तर्फे लेखी म्हणणे नि.३७ वर देऊन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, पुरावा गोळा करणेकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दिला आहे त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर करावा. प्रतिवादी नं.१ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिले नाही म्हणुन अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालवण्यात आला.

(४). वादी व प्रतिवादी यांच्या ज्येष्ठ विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. मा.सर्वोच्च न्यायालयाने ***<u>ई. नायर विरुध्द पी. नायर [१९८७ सीजे(सर्वोच्च न्यायालय)२३०]</u>*** या न्यायनिवाड्यामध्ये असे गुणोत्तर नमुद केले आहे की, जेंव्हा दोन पक्षकारांमध्ये एकमेकालगतच्या मिळकतीच्या चतुःसिमेबाबत वाद असेल तेंव्हा तशा प्रकरचा दावा चालवण्याचा दिवाणी न्यायालास अधिकार आहे व तशा प्रकरणामध्ये हद्दी निश्चितीसाठी कोर्ट कमीशनरची नेमणुक करता येते. सदर न्यायनिवाड्यातील गुणोत्तर प्रस्तुत कामी योग्य रितीने लागु होते. प्रस्तुत कामी मौजे नागराळे येथील दावा मिळकत सि.स.नं. ९३ या मिळकतीची उपअधिक्षक

भुमी अभिलेख, पलूस यांचेमार्फत मोजणी होणे जरुरीचे आहे. सबब पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख, पलूस यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. कोर्ट कमीशनर यांनी मौजे नागराळे ता.पलूस येथील सि.स.नं.९३ ची सरकारी अभिलेखाप्रमाणे उपलब्ध मुळ नकाशावरुन मोजणी करावी व सदर मोजणीचा वस्तुस्थितीदर्शक नकाशा म्हणजेच सदर मिळकतीच्या मुळ अभिलेखाप्रमाणे हद्द तसेच सदर मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असल्यास ते कोणी केले व त्याचे क्षेत्र किती याबाबतचा सविस्तर अहवाल कोर्ट कमीशनरचे पत्र मिळाल्यापासुन दोन महिन्यात सादर करावा.

४. वादीने कोर्ट कमीशनरची फी परस्पर उपअधिक्षक भुमी अभिलेख, पलूस यांचे कार्यालयात जमा करावी. त्याचप्रमाणे कोर्ट कमीशनर यांना मोजणीकामी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे द्यावीत.

५. वादी यांनी वर नमुदप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर कमीशन पत्र जारी करावे.

सही/xx

पलूस. (के.एस.सुर्यवंशी)

दि.१८/१२/२०१८. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलूस